दैनिक
# आकर्षण
वर्धापन दिन
संपादक : विजय सांगळे
वर्ष ५ । अंक १० । गुरुवार २४ सप्टेंबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322




# भिंगारमध्ये विसर्जनावरून रणकंदन!
# तरुणाच्या मृत्यूनंतर रास्तारोको

**पोलिसांवर कारवाईची मागणी । लाठीमाराच्या आरोपाने वातावरण तापले; सर्वपक्षीय नेते रस्त्यावर, भिंगार कडकडीत बंद; एसपींचा खुलासा'लाठीमारामुळे मृत्यू झाल्याचे प्रथमदर्शनी दिसत नाही'**






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार येथील गणेश विसर्जन मिरवणुकीला गालबोट लागले असून, मिरवणूक संपण्यास अवघा तासभर बाकी असताना झालेल्या गोंधळानंतर पोलिसांनी सौम्य लाठीमार केल्याच्या आरोपावरून वातावरण चांगलेच तापले आहे. या गोंधळानंतर काही वेळातच मिरवणुकीत सहभागी असलेले भिंगारमधील दीपक वाघस्कर हे युवक अचानक रस्त्यावर कोसळले. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. युवकाच्या मृत्यूमुळे संतप्त झालेल्या भिंगारवासीयांनी गुरुवारी सकाळी ११ वाजता नगर-पाथर्डी मार्गावर रास्तारोको आंदोलन सुरू केले. या आंदोलनाला सर्वपक्षीय नेत्यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला. पोलिस प्रशासनाच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली असून, वाघस्कर यांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

बुधवारी (दि. २३) भिंगार येथे गणेश विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात सुरू होती. रात्री दहा वाजेपर्यंत विसर्जन पूर्ण करण्याचे नियोजन होते. मिरवणुकीत मोठ्या आवाजातील डीजेचा वापरही करण्यात आला होता. रात्री सव्वानऊच्या सुमारास मिरवणुकीदरम्यान काही कारणावरून गोंधळ निर्माण झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागल्याचे पोलिस प्रशासनाकडून सांगण्यात आले. या वेळी झालेल्या पळापळीत काही गणेश मंडळांचे विसर्जन झाले होते, तर एक-दोन मंडळे विसर्जनासाठी शिल्लक होती. मिरवणूक संपण्यास अवघा तास बाकी असतानाच हा प्रकार घडल्याने परिसरात तणाव निर्माण झाला.

या गोंधळानंतर काही वेळाने दीपक वाघस्कर हे मिरवणुकीत अस्वस्थ वाटत असताना अचानक खाली कोसळले. त्यांना पोलिस आणि मंडळातील कार्यकर्त्यांनी तातडीने रुग्णालयात नेले. मात्र त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. नेमका मृत्यू कशामुळे झाला, याचे कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. मात्र वाघस्कर यांच्या मृत्यूचा संबंध पोलिसांच्या लाठीमाराशी असल्याचा आरोप संतप्त नागरिक व कार्यकर्त्यांकडून करण्यात आल्याने या प्रकरणाला राजकीय वळण मिळाले.


घटनेची माहिती मिळताच ■ पान ४ वर

### 'व्हिडिओ तपासले, वाघस्कर त्यात दिसत नाहीत'



जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गुरुवारी सकाळी पत्रकारांशी बोलताना या प्रकरणाबाबत पोलिसांची भूमिका स्पष्ट केली. दीपक वाघस्कर हे मिरवणुकीदरम्यान अस्वस्थ वाटल्याने खाली पडले. पोलिस आणि मंडळातील कार्यकर्त्यांनी त्यांना रुग्णालयात नेले. आपण स्वतः या घटनेची चौकशी केली असून उपलब्ध व्हिडिओ फुटेजही तपासले आहे. संबंधित व्हिडिओमध्ये वाघस्कर दिसत नसल्याचे त्यांनी सांगितले. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. या घटनेची चौकशी करण्यात येणार असून, कोणाची चूक आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे सुदर्शन यांनी स्पष्ट केले.

## ॲड. अंबरीश धर्माधिकारी यांना मातृशोक



**आष्टी –** आष्टी येथील श्री दत्त मंदिर गल्लीतील रहिवासी, सिद्धी कॉम्प्युटरचे संचालक अभय धर्माधिकारी सकाळचे वार्ताहर अनिरूध्द धर्माधिकारी तसेच दैनिक आकर्षणचे कार्यकारी संपादक तथा ॲडव्होकेट अंबरीश धर्माधिकारी यांच्या मातोश्री अंजली अरविंद धर्माधिकारी यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच आष्टी शहर व परिसरात शोककळा पसरली. बुधवारी सकाळी १० वाजता शेकापूर रोडवरील खंडोबा मंदिर स्मशानभूमित शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर पत्रकार वकील व्यापारी तसेच स्थानी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. धर्माधिकारी परिवाराच्या दु:खात परिसरातील नागरिकांनसह दैनिक आकर्षक परिवारातर्फे संपादक विजय सांगळे यांनी व दैनिक आकर्षक परिवार यांनी सहभागी होऊन श्रद्धांजली वाहिली.

## प्रोफेसर कॉलनी चौकातील खाद्यपदार्थ स्टॉलवर अन्न व औषध प्रशासनाची धाड

**अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांनी केली खाद्यपदार्थ व स्वच्छतेची तपासणी**
**दर्जेदार खाद्यपदार्थ व स्वच्छ किचन ठेवण्याच्या सूचना**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रोफेसर कॉलनी चौकातील विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलची स्वच्छता व खाद्यपदार्थांची तपासणी करण्यात आली. अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांनी खाद्यपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता तसेच किचनमधील स्वच्छतेची पाहणी करून खाद्यपदार्थ व्यवसायिकांना आवश्यक सूचना दिल्या. खाद्यपदार्थ दर्जेदार ठेवण्यासह किचन स्वच्छ ठेवावे, कुकने आवश्यक ती काळजी घ्यावी तसेच दुकानाचा परवाना दर्शनी भागावर लावावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. भविष्यात या नियमांचे पालन न झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही डॉ. प्रदीप पवार यांनी दिला.

या मोहिमेत हायजिन फर्स्ट संस्थेचा पुढाकार होता. ■ पान ४ वर

## वीस मिनिटांचा पाऊस; दुकानदारांच्या डोळ्यात पाणी!

**नुकसानग्रस्तांना भरपाई द्या । तुंबलेल्या चेंबर्समुळे पाण्याचा निचरा ठप्प । रस्त्याचे काम, नियोजनाची तांत्रिक चौकशी करण्याची योगीराज गाडे यांची मागणी**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी येथील गुलमोहर रोड परिसरात बुधवारी (दि. २३) रात्री झालेल्या अवघ्या २० मिनिटांच्या पावसाने रिपेले बिल्डिंगमधील बेसमेंटमधील दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. कोहिनूर मंगल कार्यालयासमोरील या परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा करणारे चेंबर्स तुंबल्याने पाणी दुकानांमध्ये शिरल्याचा आरोप व्यावसायिकांनी केला आहे. या प्रकाराची तातडीने तांत्रिक चौकशी करून नुकसानग्रस्त दुकानदारांना भरपाई द्यावी, अशी मागणी नगरसेवक योगीराज गाडे यांनी केली.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर गाडे यांनी गुरुवारी सकाळी घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त दुकानदारांची पाहणी केली. जयंत विठ्ठलराव देशमुख, विवेक जाधव, शिवशंकर चेमटे यांच्यासह अन्य व्यावसायिकांच्या दुकानांमध्ये पाणी शिरल्याने साहित्य व व्यवसायाचे नुकसान झाले.

गुलमोहर रोड परिसरात पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी असलेल्या चेंबर्सची योग्य देखभाल झाली नसल्याने ते तुंबले होते. परिणामी अल्पावधीत झालेल्या पावसाचे पाणी रस्त्यावर साचून बेसमेंटमधील दुकानांमध्ये शिरले. या पार्श्वभूमीवर परिसरातील पाणी निचरा यंत्रणेची पाहणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

नगरसेवक गाडे यांनी या घटनेबाबत ■ पान ४ वर

### सुट्टीची सूचना

गणेश विसर्जना दिनानिमित्त 'दैनिक आकर्षण' कार्यालयास शुक्रवार दि. २५ रोजी सुट्टी असल्याने या दिवशीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

गणेश विसर्जन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

– संपादक

## नेवासा पोलिसांच्या पाठीशी वरिष्ठ खंबीर; राजकीय दबावाला बळी न पडता काम करण्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांचे निर्देश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** कायदा व सुव्यवस्था सांभाळताना प्रामाणिकपणे काम करताना काही चुका झाल्या तरी नेवासा पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाठीशी वरिष्ठ अधिकारी खंबीरपणे उभे राहतील, असा भक्कम विश्वास नाशिक परि क्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांनी व्यक्त केला. तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळताना कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता काम करण्याचे निर्देश देत त्यांनी नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना एकप्रकारे फ्री हॅन्ड दिला आहे.

विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांनी गुरुवारी नेवासा पोलीस ठाण्याला अचानक भेट देऊन संपूर्ण कामकाजाचा सखोल आढावा घेतला. या अचानक झालेल्या भेटीमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली असली, तरी त्यांनी दाखवलेल्या विश्वासाने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनोबल कमालीचे उंचावले आहे. यावेळी त्यांच्यासोबत अप्पर पोलीस अधीक्षक (श्रीरामपूर) सोमनाथ वाकचौरे आणि पोलीस उपअधीक्षक नीरज राजगुरू उपस्थित होते. नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी विशेष पोलीस महानिरीक्षकांचे स्वागत केले.

गेल्या दोन महिन्यांत नेवासा ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### आनंद तीर्थ समवशरण येथे शनिवारी कविता गांधी यांच्या ३१ उपवासांचे पच्चक्खाण




अहिल्यानगर- राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात भाविक अतिशय श्रद्धेने धर्म साधना, तपस्या, उपवास करत आहेत. आत्मोन्नतीची अनुभूती देणारा चातुर्मास सर्वांना सकारात्मक ऊर्जा देणारा ठरत आहे. भिंगार येथील कविता प्रफुल्ल गांधी (करंजीवाले) यांनी या अनुष्ठानात सहभागी होत मासखमण (३१ उपवास) केले आहेत. त्यांच्या तपस्येचे पच्चक्खाण शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता होणार आहे, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली. श्राविका कविता गांधी यांनी चातुर्मासात अतिशय श्रद्धेने ३१ दिवसांचे उपवास केले. त्यांचे पच्चक्खाण महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., पूज्य सत्यप्रभाजी म.सा. पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात होणार आहे. यानिमित्त आनंदधाम ते आनंद तीर्थ समवशरण पर्यंत वरघोडा निघेल. तसेच तपस्वींसाठी पुणे येथील सुप्रसिद्ध जैन गायक तरूण मोदी यांचा भावा कार्यक्रम होणार आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या नावाखाली 'लकी ड्रॉ'द्वारे लाखो रुपयांची फसवणूकीचा आरोप

अहिल्यानगर - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे पवित्र नाव वापरून कर्जत येथे विनापरवाना बेकायदेशीर 'लकी ड्रॉ' चालवून, सर्वसामान्य नागरिकांना व महिलांना पैठणी साड्यांचे आमिष दाखवत लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करा, अशी मागणी छावा क्रांतिवीर सेनेचे शहराध्यक्ष मनोज कर्डिले यांनी केली आहे. या गंभीर आर्थिक अपहाराबाबत जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक आणि कर्जत पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला आहे. छावा क्रांतिवीर सेनेने दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, १४ एप्रिल २०२६ रोजीच्या जयंतोत्सवाचे निमित्त साधून मुख्य आयोजक तथा वंचित बहुजन आघाडीचा युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे याने व त्यांच्या सहकाऱ्यांनी राजकीय पदाचा गैरवापर करत प्रति कूपन २०० रुपये दराने विक्री केली. यात इलेक्ट्रिक स्कूटर, एलसीडी टीव्ही, कुलर आणि महिलांसाठी 'पैठणी साड्या' यांसारखी आकर्षक बक्षिसे जाहीर करून हजारो गरीब व सर्वसामान्य महिलांची मोठी आर्थिक फसवणूक करण्यात आली. या उपक्रमाला कोणतीही शासकीय परवानगी नसून शासनाचा लाखो रुपयांचा महसूलही बुडवण्यात आला आहे.

### प्रमोद सोबले यांचे निधन



अहिल्यानगर - केडगाव येथील रहिवासी व निवृत्त शिक्षक प्रमोद नामदेव सोबले यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या मागे तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रयत शिक्षण संस्थेत त्यांनी ३८ वर्षे अध्यापनाचे कार्य केले. शिस्तप्रिय, पण तितकेच प्रेमळ अशी त्यांची ख्याती होती. इतर शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल प्रचंड आदर होता. त्यांनी संस्थेच्या विविध शाळांत अध्यापनाचे कार्य केले. निवृत्त उपनिबंधक मिलिंद सोबले, तसेच नितीन, मुकुंद सोबले व डॉ. स्नेहलता ज्ञानदेव चोपडे यांचे ते वडील होत. केडगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## आदिनाथ सहकारी साखर कारखाना आता ओंकार ग्रुपच्या ताब्यात ; कोर्टाने केले शिक्कामोर्तब

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** करमाळा (जि. सोलापूर): राज्यातील सहकारी साखर उद्योगाला नवसंजीवनी देण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत ओंकार ग्रुपने राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ () मार्फत राबविण्यात आलेल्या विक्री निविदा, खरेदी प्रक्रियेत यश मिळवत श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि., आदिनाथनगर, शेळगाव भाळवणी, ता. करमाळा, जि. सोलापूर हा कारखाना ताब्यात घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे आणि यावर कोर्टानेही शिक्कामोर्तब केला आहे.

कायदेशीर बाबी, न्यायालयीन प्रक्रिया तसेच संबंधित प्राधिकरणांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून पारदर्शक विक्री निविदा प्रक्रियेद्वारे ओंकार साखर कारखाना प्रा. लि. यांनी आदिनाथ कारखाना यशस्वीरित्या खरेदी केलेला आहे. या प्रक्रियेमुळे अनेक वर्षांपासून अडचणीत असलेल्या आदिनाथ साखर कारखान्याला नवसंजीवनी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांनी सुरुवातीपासूनच शेतकरी, कामगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांना केंद्रस्थानी ठेवून उद्योग उभारणीचे धोरण स्वीकारले आहे. यापूर्वीही ओंकार ग्रुपने विविध अडचणीत आलेले साखर कारखाने यशस्वीरित्या सुरू करून शेतकऱ्यांच्या ऊसाला बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे आदिनाथ कारखान्याच्या पुनरुज्जीवनाबाबत परिसरातील शेतकरी, कामगार व व्यापारी वर्गामध्ये आशावादाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ओंकार ग्रुपने हा कारखाना खरेदी केल्यामुळे करमाळा तालुक्यासह परिसरातील हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. ऊसाचे वाहतूक अंतर कमी होणार असून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला स्थानिक स्तरावर सुविधा उपलब्ध होणार आहे. याचा थेट परिणाम ऊसतोड मजूर, वाहतूकदार, स्थानिक व्यापारी, लघुउद्योजक आणि ग्रामीण रोजगारावर होणार आहे.

ओंकार ग्रुपच्या व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे की, कारखान्याचे आधुनिकीकरण, उत्पादन क्षमता वाढ, कार्यक्षम व्यवस्थापन आणि सहउद्योगांच्या माध्यमातून कारखाना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच शेतकऱ्यांना योग्य ऊसदर, पारदर्शक व्यवहार आणि वेळेत देयके देण्याचे धोरण ठेवण्यात येणार आहे. परिसरातील शेतकरी प्रतिनिधींनीही या घडामोडीचे स्वागत केले असून, बंद किंवा अडचणीत आलेल्या उद्योगांना नवजीवन देण्याची ओंकार ग्रुपची भूमिका ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक असल्याचे मत व्यक्त केले आहे. आदिनाथ साखर कारखान्याचे पुनरुज्जीवन हे केवळ एका उद्योगाचे हस्तांतरण नसून, संपूर्ण परिसरातील शेती, रोजगार आणि आर्थिक विकासाला नवी दिशा देणारे पाऊल असल्याची भावना शेतकरी व नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## परिवर्तिनी एकादशीला पैठणमध्ये हजारो वारकऱ्यांची मांदियाळी

### दुष्काळाची तीव्रता कमी होण्यासाठी संत एकनाथ महाराजांच्या चरणी साकडे; गोदाकाठ हरिनामाच्या गजराने दुमदुमला



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** परिवर्तिनी (मासिक) एकादशीनिमित्त मंगळवारी दक्षिण काशी पैठण येथे हजारो वारकरी, भाविक आणि भक्तांनी संत एकनाथ महाराजांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेत दुष्काळाची तीव्रता कमी होऊन चांगला पाऊस पडावा, यासाठी साकडे घातले. राहता वाडा येथील नाथ मंदिरासह शहरातील विविध मंदिरांमध्येही दिवसभर भाविकांची मोठी गर्दी झाली. गोदातीर, दोन्ही नाथ मंदिरे, यात्रा मैदान, खंडोबा चौक, बसस्थानक परिसरासह शहरातील प्रमुख रस्ते सकाळपासून सायंकाळपर्यंत वारकरी-भाविकांच्या गर्दीने गजबजून गेले होते. गावागावातून मजल-दरमजल करत हरिनामाचा गजर करीत पैठणमध्ये दाखल झालेल्या लहान-मोठ्या पायी दिंड्यांनी भाविकांचे लक्ष वेधून घेतले. भाविकांना सुरळीत दर्शन मिळावे यासाठी संस्थानचे अध्यक्ष आमदार विलास बापू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या नियंत्रणाखाली मंदिर परिसरासह शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, मंदिर परिसरात भाविकांसाठी साबुदाणा खिचडीच्या प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो वारकरी व भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला.




बागडपटटीचा राजा प्रतिष्ठान सृष्टीची उत्पत्ती आणि विनाश हा जिवंत देखावा (छायाचित्र- उदय जोशी)

## विरभद्र मित्र मंडळाचे कार्य कौतुकास्पद – कमलाकर चौधरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**सुरेगाव–** गणेशोत्सवाच्या काळात धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक सलोखा, शिस्त आणि कायद्याचे पालन राखण्याची जबाबदारी मंडळांच्या कार्यकर्त्यांवरही असते. याच पार्श्वभूमीवर कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथील विरभद्र मित्र मंडळाच्या वतीने यंदाही गणेशोत्सवाचे विविध कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आले आहेत.
मंडळाच्या या कार्याचे कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी यांनी कौतुक केले.
विरभद्र मित्र मंडळाच्या गणरायाची आरती काल सायंकाळी पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी यांच्या शुभहस्ते पार पडली. यावेळी त्यांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले.
यावेळी बोलताना कमलाकर चौधरी म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे यंदाही विरभद्र मित्र मंडळाने गणेशोत्सवाचे चांगल्या पद्धतीने आयोजन केले आहे. मंडळाने ही परंपरा पुढील वर्षीही कायम ठेवावी. उत्सवाच्या काळात कोणतीही अनुचित घटना किंवा कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. कायद्याचे पालन करून उत्सव साजरा करावा. विरभद्र मित्र मंडळाचे कार्य कौतुकास्पद असून, मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले.
याप्रसंगी हेड कॉन्स्टेबल किसन सानप यांच्यासह विरभद्र मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रस्ते विकासाला १५ कोटींची प्रशासकीय मंजुरी- आमदार काशिनाथ दाते सर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या विकासाला आणखी एक महत्त्वपूर्ण बळ मिळाले असून, लेखाशिर्ष ३०५४ अंतर्गत गट-बमधून तब्बल १५ कोटी रुपयांच्या आठ महत्त्वपूर्ण रस्ता विकासकामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सांगितले. मतदारसंघातील ग्रामीण रस्त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला या मंजुरीच्या माध्यमातून मोठे यश मिळाले असून, या कामांमुळे ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे.

मंजूर कामांमध्ये प्रजिमा-१९२ निघोज ते कोल्हे वस्ती रस्ता, सा.क्र. ०/०० ते १/५०० कामासाठी २ कोटी ८० लाख रुपये, प्रजिमा-१९२ वडनेर बु. मुक्ताबाई शिव ते वाकण मळा सुकाळे वस्ती रस्ता, सा.क्र. ०/०० ते ३/०० यासाठी १ कोटी ९० लाख रुपये, प्रजिमा-१९२ ते शिववाडी-मोरवाडी-लामखडे वस्ती रस्ता, सा.क्र. ०/०० ते ९/०० यासाठी २ कोटी ६० लाख रुपये, तसेच -७६१ कुंरद भोसलेवाडी ते नरवडे वाडी रस्ता, सा.क्र. ०/०० ते ३/०० यासाठी २ कोटी ६० लाख रुपये निधीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

याशिवाय वाजेवाडी बाबरमळा-बो-हाडे वस्ती कॅनॉल रस्ता, सा.क्र. ०/०० ते ३/०० या कामासाठी ९० लाख रुपये, प्रजिमा-१९२ ते रसाळवाडी रस्ता, सा.क्र. ०/०० ते ३/०० यासाठी २ कोटी ८० लाख रुपये, वडनेर बु. ते टेंभीमळा रस्ता, सा.क्र. ०/०० ते २/४०० यासाठी ७० लाख रुपये आणि वाजेवाडी ढोकमाळ ते कॅनॉल रस्ता, सा.क्र. ०/०० ते २/६०० यासाठी ७० लाख रुपये अशा एकूण १५ कोटी रुपयांच्या आठ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असुन लवकरच या कामांचा शुभारंभ होणार असल्याची माहिती आमदार दाते यांनी सांगितले.

**''रस्ता विकासातून गावागावांचा विकास''**

**या भूमिकेतून मतदारसंघातील रस्त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्याच पाठपुराव्याच्या माध्यमातून एकाच वेळी आठ महत्त्वपूर्ण रस्ता कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने पारनेर मतदारसंघातील ग्रामीण रस्ते विकासाला निश्चितच नवी दिशा आणि गती मिळणार आहे, १५ कोटी रुपयांच्या या प्रशासकीय मंजुरीमुळे पारनेरच्या ग्रामीण भागातील रस्ते विकासाच्या कामांना भक्कम आर्थिक आधार मिळाला असून, आगामी काळात या कामांमुळे गावागावांतील दळणवळण अधिक सुखकर आणि गतिमान होईल.**

**आ. काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

**निघोज जिल्हा परिषद गटातील रस्त्यांच्या विकासासाठी तब्बल १५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळणे ही केवळ विकासकामांची मंजुरी नसून, ग्रामीण जनतेच्या अपेक्षांना मिळालेला न्याय आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांनी जनतेच्या प्रश्नांना केवळ ऐकून न घेता, त्यांचा सातत्याने पाठपुरावा करून ते प्रत्यक्षात मार्गी लावण्याची आपली बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. निघोजसह परिसरातील वाड्या-वस्त्यांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने या निर्णयाचा आनंद प्रत्येक ग्रामस्थाच्या मनाला स्पर्श करणारा आहे. विकासाची ही गती अशीच कायम राहावी आणि आपल्या भागातील प्रत्येक रस्ता, प्रत्येक वस्ती मुख्य प्रवाहाशी जोडली जावी, हीच जनतेची अपेक्षा आहे. आमदार दाते सरांच्या या प्रयत्नांसाठी निघोज जिल्हा परिषद गटातील जनतेच्या वतीने मनःपूर्वक कृतज्ञता.**

**- सौ.सुधामती कवाद**
**(कार्याध्यक्षा राष्ट्रवादी काँग्रेस अहिल्यानगर)**

या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल आमदार काशिनाथ दाते सर यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा पवार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री मा. जयकुमार गोरे तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष आभार मानले आहेत.

## शेतकऱ्यांच्या विश्वासावर उभी राहिली सुरेगावकर बाजार समितीची भक्कम वाटचाल





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** घाम गाळतो शेतकरी रानात, म्हणून अन्न येते आपल्या पानात... शेतकऱ्याच्या कष्टातून उभे राहणारे प्रत्येक पीक ही केवळ शेतीची उपज नसते, तर त्यामागे असतो अनेक दिवसांचा घाम, मेहनत, खर्च आणि अनिश्चिततेशी केलेला संघर्ष. शेतात पिकवलेला माल बाजारात आणल्यानंतर त्याला योग्य बाजारपेठ मिळावी, व्यवहारात पारदर्शकता असावी आणि आपल्या मालाला मिळणाऱ्या भावाबाबत विश्वास वाटावा, ही शेतकऱ्याची अपेक्षा असते. याच विचाराला केंद्रस्थानी ठेवून सुरेगाव येथे सुरू झालेली सुरेगावकर कृषी उत्पन्न खाजगी बाजार समिती () आज शेतकरी आणि बाजारपेठ यांच्यातील विश्वासाचा महत्त्वाचा दुवा बनत आहे.
मे २०२३ मध्ये कांदा लिलावाने सुरू झालेल्या या बाजार समितीने अल्पावधीत आपल्या कामाचा विस्तार करत भुसार माल आणि डाळिंबासाठीही बाजारपेठ उपलब्ध करून दिली. या संपूर्ण प्रवासामागे केवळ व्यवसाय उभारण्याची कल्पना नाही, तर कृषी क्षेत्रात तब्बल १७ वर्षे कष्ट करून मिळवलेला अनुभव आहे. संस्थापक श्री. शशिकांत भानुदास वाबळे यांचा हा प्रवास संघर्षातून घडलेला आहे.
मे २००७ मध्ये पंढरपूर येथून त्यांच्या कृषी क्षेत्रातील प्रवासाला सुरुवात झाली. डाळिंब व फळबाजारात त्यांनी एका सामान्य मजुरापासून कामाला सुरुवात केली. परिस्थिती सोपी नव्हती; मात्र मेहनत, जिद्द आणि बाजारपेठेचा अनुभव घेत त्यांनी हळूहळू व्यापारी म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. पंढरपूरमधील सात वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवानंतर तत्कालिन राहता बाजार समितीचे सचिव उद्धव राव देवकर यांच्या सल्ल्याने नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या स्वप्नातल डाळिंब मार्केट त्यांच्याच सहकार्याने आणि मार्गदर्शनाने सुरू करून राहाता डाळिंब मार्केटमध्ये आठ वर्षे काम करण्याची संधी मिळाली. या काळात कृषीमालाचा व्यवहार, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि बाजारपेठेतील बदल यांचा जवळून अनुभव त्यांना मिळाला.
याच अनुभवाच्या बळावर मे २०२३ मध्ये सुरेगाव येथे सुरेगावकर कृषी उत्पन्न खाजगी बाजार समितीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. सुरुवातीला कांदा लिलावाने कामकाज सुरू झाले. शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढत गेला आणि त्यांच्या मागणीनुसार २०२४ मध्ये भुसार मालाच्या लिलावाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर डाळिंब उत्पादकांच्या आग्रहावरून २०२५ मध्ये आमदार आशुतोषदादा काळे यांच्या मार्गदर्शनाने डाळिंब मार्केट सुरू करण्यात आले. डाळिंबाची आवक वाढल्यानंतर जागेची आवश्यकता निर्माण झाली असता आमदार आशुतोष काळे यांनी संस्थेला जागा करारावर उपलब्ध करून दिल्याने डाळिंब उत्पादकांसाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले.आज या बाजार समितीत केवळ परिसरातीलच नव्हे, तर सात जिल्ह्यांमधून शेतकरी आपला शेतीमाल विक्रीसाठी घेऊन येत असल्याचे संस्थेकडून सांगण्यात येते. काही शेतकरी तब्बल २५० ते ३०० किलोमीटर अंतरावरूनही माल घेऊन येथे येतात. या वाढत्या प्रतिसादामागे सोशल मीडियावरील प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष व्यवहारातून निर्माण झालेला विश्वास महत्त्वाचा मानला जात आहे. अचूक भाव, पारदर्शक वजन-मापे आणि डिजिटल व्यवहार यावर संस्थेचा भर असून शेतकऱ्यांना व्यवहाराबाबत स्पष्टता मिळावी, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.सुरेगाव येथून संचालित होणारा वाबळे उद्योग समूह देखील शेतीमालाच्या बाजारपेठेपुरता मर्यादित न राहता ग्रामीण भागाशी जोडलेल्या विविध क्षेत्रांत कार्यरत आहे. समूहाच्या माध्यमातून 'श्री भानुदास रघुनाथ वाबळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था' कार्यरत असून आर्थिक सहकार्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अत्यंत कमी कालावधीत 'विदाऊट पेंडिंग लोन' अर्थात विना थकबाकी कर्जव्यवहाराची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न या पतसंस्थेच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे सांगण्यात येते.
या बाजार समितीच्या माध्यमातून आज २० कर्मचारी आणि ३०० हून अधिक मजुरांना थेट रोजगार मिळत असल्याचे संस्थेकडून सांगण्यात येते. शेतीमालाच्या खरेदी-विक्रीसोबतच स्थानिक रोजगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळत आहे.
एका सामान्य मजुरापासून सुरू झालेला १७ वर्षांचा संघर्ष, पंढरपूर आणि राहाता येथून मिळालेला अनुभव आणि त्यातून सुरेगावमध्ये उभे राहिलेले हे कृषी बाजारपेठेचे व्यासपीठ, हा प्रवास निश्चितच मेहनत आणि सातत्याची कहाणी सांगणारा आहे. शेतकऱ्याच्या कष्टाला बाजारपेठ, व्यवहारात पारदर्शकता आणि कष्टकरी हातांना रोजगार देण्याच्या प्रयत्नातून सुरेगावकर कृषी उत्पन्न खाजगी बाजार समितीची वाटचाल सुरू आहे. शेतकऱ्याचा विश्वास हीच खरी कमाई मानत, कष्टाच्या या वाटेवरून ही संस्था पुढील काळात आणखी विस्ताराच्या दिशेने वाटचाल करत आहे. याचे सर्व श्रेय आमच्या मार्केटमध्ये असणारे कर्मचारी नसून स्वतःचीच बाजार समिती समजून कामकाज करतात त्यामुळे हे सर्व शक्य होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### दुष्काळ जाहीर करून ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा



अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने पाहणी करून जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे चालू शैक्षणिक वर्षाचे शैक्षणिक शुल्क माफ करून त्यांनी भरलेले प्रवेश व परीक्षा शुल्क परत करावे, अशी मागणी अहिल्यानगर विद्यार्थी काँग्रेस, शिक्षक काँग्रेस, क्रीडा काँग्रेस विभागाच्या वतीने करण्यात आली. याबाबत निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेती, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा तसेच रोजगारावर त्याचा गंभीर परिणाम झाला असून शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्ग आर्थिक अडचणीत सापडला आहे. या परिस्थितीचा परिणाम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही होत आहे. शेतीचे उत्पन्न घटल्याने अनेक कुटुंबांना महाविद्यालयीन शुल्क भरणे आर्थिकदृष्ट्या कठीण झाले आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पात्र विद्यार्थ्यांचे चालू शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण वार्षिक शैक्षणिक शुल्क माफ करावे, विद्यार्थ्यांनी भरलेली प्रवेश व परीक्षा फी परत मिळवून द्यावी किंवा त्याची संपूर्ण रक्कम शासनाने संबंधित महाविद्यालयांना अदा करावी, अशी मागणी करण्यात आली. दुष्काळी परिस्थितीबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल करू नये. तसेच विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मुदतवाढ देऊन विनामूल्य प्रवेशाची व्यवस्था करावी, आवश्यक कागदपत्रे व परीक्षा प्रवेशासंदर्भातील सवलतींची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक सवलत व आर्थिक मदतीचे पॅकेज शासनाने जाहीर करावे, अशी मागणी विद्यार्थी काँग्रेस व शिक्षक आघाडीच्या वतीने करण्यात आली.यावेळी अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस शिक्षक आघाडीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब पवार, शहर काँग्रेस क्रीडा विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण गीते पाटील, शिक्षक विभागाचे राज्य सरचिटणीस डॉ. बापू चंदनशिवे, काँग्रेस शहराध्यक्ष एस.सी. विभागाचे नाथा अल्हाट, युवक काँग्रेसचे नगर तालुका अध्यक्ष अँड. अक्षय कुलट, अहिल्यानगर शिक्षक विभागाचे जिल्हा सचिव मयूर रोखले, अजित कुऱ्हाडे, आकाश पवार, रियाज शेख, विवेक कसबे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### मांदळी, चिंचोलीत स्वच्छता अभियान

अहिल्यानगर - पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासोबतच सार्वजनिक स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी आणि साथीच्या आजारांना प्रतिबंध करता यावा, या उद्देशाने स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने विविध गावांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या सामाजिक उपक्रमांतर्गत कर्जत तालुक्यातील श्री क्षेत्र मांदळी तसेच पारनेर तालुक्यातील चिंचोली येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्याला सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची जोड मिळावी, या हेतूने संस्थेच्या वतीने स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. गावातील मंदिर परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच भाविकांची वर्दळ असलेल्या परिसरातील कचरा साफ करण्यात आला. नागरिकांनी आपल्या परिसराची स्वच्छता राखावी, कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकू नये आणि उत्सव काळात स्वच्छतेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### निवृत्त इंजिनिअर रामभाऊ सोनवणे यांचे निधन

अहिल्यानगर- हिंगणगाव येथील रहिवासी,



मनमिळावू स्वभावाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि सेंट्रल गव्हर्नमेंटच्या सी.क्यू.ए.व्ही. () कार्यालयातील निवृत्त इंजिनिअर रामभाऊ जबाजी सोनवणे (वय ८४) यांचे नुकतेच वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. त्यांनी केंद्र सरकारच्या कार्यालयात तब्बल ३८ वर्षे इंजिनिअर या पदावर निष्ठापूर्वक सेवा बजावली होती. उद्योजक दीपक सोनवणे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा पत्नी, दोन मुली सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# कुकडीच्या अध्यक्षपदी घावटे तर उपाध्यक्षपदी गाडीलकर यांची निवड



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**जवळे–** तालुका पारनेर तालुक्यातील जवळे येथील कुकडी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अँड. गायत्री घावटे यांची तर उपाध्यक्षपदी वैशाली गाडीलकर यांची निवड झाली. पारनेर तालुका कार्यक्षेत्र असलेल्या कुकडी सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक अधिमंडळाची निवडणूक नुकतीच बिनविरोध संपन्न झाली होती.

कुकडीच्या इतर संचालक पदी गजानन सोमवंशी, गोविंद बडवे, नवनाथ सालके,सुरेश कारखिले,सतीश शेळके, प्रभाकर घावटे, संतोष तांबे, साहेबराव मोरे, आणि अशोक शिंदे यांची बिनविरोध निवड झाली होती. वर्षभरापूर्वी स्थापन झालेल्या कुकडी सहकारी पतसंस्थेकडे सुमारे एक कोटी रुपयांच्या ठेवी असून सत्तर लक्ष रुपयांचे सुरक्षित कर्ज वाटप केलेले आहे. पतसंस्थेच्या सर्व सभासदांनी या अधिमंडळाला बिनविरोध निवडून दिल्यामुळे आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो आम्ही सार्थ ठरवू आणि या पतसंस्थेला प्रगतीपथाकडे घेऊन जाऊ असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्षांनी व्यक्त केला. सहकार विभागातील निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राजेश चाबुकस्वार यांनी कामकाज पाहिले. संस्थेचे कार्यकारी संचालक सुनिल चौधरी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे खातेदार, सभासद मोठ्या संख्येने हजर होते.

# सावेडीत संस्कृत दिन उत्साहात साजरा





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर अंतर्गत असलेल्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथे सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी संस्कृत दिन आनंदी व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. सरस्वती प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी प्रमुख अतिथींच्या हस्ते संस्कृत वस्तू प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. गुणदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले.

विद्यार्थिनीने गणेशवंदना गीतावर शास्त्रीय नृत्य सादर केले. इतर विद्यार्थिनींनी संस्कृत बोधकथेचे कथाकथन केले. विद्यार्थ्यांनी 'सरमाया: शीलम्' या संस्कृत पोवाड्याचे सादरीकरण केले. तसेच संस्कृत नाटिका, संस्कृत स्तोत्रावर आधारित योगासने, संस्कृत गीतांवर भरतनाट्यम नृत्य, संस्कृत भाषेतून संस्कृत महिमा आणि संस्कृत हास्यकणिकांचे सादरीकरण करण्यात आले. काही विद्यार्थिनींनी संस्कृत भाषेचा व भारताचा गुणगौरव मांडला.

प्रमुख अतिथी रेणुका मुळे यांनी आपल्या ओघवत्या भाषाशैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी संस्कृत भाषेचे प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेतील महत्त्व विशद केले. तसेच आधुनिक काळातील तिची उपयुक्तता व भविष्यातील संभाव्यता यावर सविस्तर विवेचन केले. योग, आयुर्वेद, भारतीय तत्त्वज्ञान, संगीत, स्थापत्यशास्त्र, संगणकीय भाषा अशा विविध ज्ञानशाखांशी संस्कृतचा असलेला संबंध त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. संस्कृत ही केवळ भूतकाळापुरती मर्यादित असलेली भाषा नसून भविष्यातील ज्ञाननिर्मितीची समर्थ आणि सक्षम भाषा होऊ शकते, हा विचार त्यांनी प्रभावीपणे मांडला.

आजी आणि नातवंडांची गोष्ट सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना संस्कृत व संस्कृती यांविषयी उद्बोधित केले. त्याचबरोबर महाभारतातील धर्मराज आणि दुर्योधन यांच्या कथेच्या माध्यमातून मानवी स्वभावातील सद्गुण आणि दुर्गुण यांची ओळख करून दिली.

या कार्यक्रमासाठी प्रशालेच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी आणि पर्यवेक्षिका सौ. होशिंग यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संस्कृत विभागप्रमुख सौ. अस्मिता कुलकर्णी, सहाय्यक शिक्षिका राणी अवघडे आणि सौ. प्रियांका कासार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले.

या कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन, अतिथी परिचय, अध्यक्ष परिचय, आभार प्रदर्शन आणि गुणदर्शनाचे निवेदन विद्यार्थ्यांनी सहज, सोप्या संस्कृत भाषेत पार पाडले, ही विशेष कौतुकास्पद बाब ठरली.

# सखूताई झारगड यांच्या हस्ते पाटेगावच्या गणरायाची आरती

### गणेशोत्सवात भक्तिभावाचे वातावरण; ग्रामस्थ व गणेशभक्तांची उपस्थिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** चांगतपुरी गणाच्या शिवसेनेच्या पंचायत समिती सदस्य सौ. सखूताई झारगड यांच्या हस्ते पाटेगाव येथील गणरायाची भक्तिभावाने आरती करण्यात आली. यावेळी गणेश मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरतीच्या वेळी 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. सखूताई झारगड यांनी गणरायाचे दर्शन घेतल्यानंतर उपस्थित गणेशभक्तांशी



संवाद साधला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने गावात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

# विद्याधामच्या तीन खेळाडूंची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**बेलवंडी –** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या तीन खेळाडूंनी तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत दमदार कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. नुकत्याच परिक्रमा शैक्षणिक संकुल, काष्टी येथे श्रीगोंदा तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत विद्याधामच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत तीन सुवर्णपदकांची कमाई केली.

१४ वर्षे वयोगटात कु. राजलक्ष्मी महेश चव्हाण हिने ३३ किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत राजलक्ष्मीने प्रतिस्पर्ध्यांच्या डावावर अचूक प्रतिडाव करत प्रभावी खेळाचे प्रदर्शन केले. अंतिम फेरीत तिने प्रतिस्पर्धी खेळाडूला चितपट करत विजय मिळवला.

१७ वर्षे वयोगटातील ग्रीको-रोमन कुस्ती प्रकारात पै. साई राजू खोले याने ११० किलो वजनगटात प्रथम क्रमांक मिळवला. तसेच १९ वर्षे वयोगटात पै. रोहन भास्कर मोटे याने





१३० किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली. या तिन्ही खेळाडूंची दि. १ ते ३ ऑक्टोबर रोजी नेवासा फाटा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे विद्याधामच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक श्री. संदीप घावटे, महेश चव्हाण कुस्ती पंच अमोल कातोरे यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, सचिव नंदकुमार निकम, शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया,तालुका क्रीडा समिती अध्यक्ष सचिन जामदार, मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ, पर्यवेक्षक एन. एस. डुंबरे, संजय देशपांडे, के. बी. काळे तसेच सर्व ग्रामस्थांनी तिन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले असून, आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

# फक्त कॅलरी मोजण्यापेक्षा हृदयासाठी योग्य आहार घ्या

### आहारतज्ज्ञ स्वाती अवस्थी, एचओडी, डायटेटिक्स विभाग, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** या जागतिक हृदय दिनानिमित्त, ''कमी तेल, कमी मीठ'' यासोबतच हृदय निरोगी ठेवण्यासाठी योग्य आणि पौष्टिक आहार घेण्याकडेही लक्ष देऊया. आपले हृदय दिवसातून एक लाखांहून अधिक वेळा धडधडते आणि न थांबता सतत आपले काम करत राहते. मात्र, कोलेस्टेरॉल, रक्तदाब किंवा रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यानंतरच आपण हृदयाच्या आरोग्याचा विचार करतो. प्रत्यक्षात हृदयाचे आरोग्य आपल्या रोजच्या सवयींवर अवलंबून असते. आपण काय खातो, किती हालचाल करतो, किती चांगली झोप घेतो आणि आरोग्यदायी सवयी किती नियमितपणे पाळतो, याचा त्यावर परिणाम होतो. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे हृदयाच्या आरोग्याकडे केवळ उपचारांच्या दृष्टीनेच नव्हे, तर आजार टाळणे आणि निरोगी जीवनशैली यावरही भर दिला जातो. आहाराच्या बाबतीत हृदयासाठी योग्य आहार म्हणजे कंटाळवाणा, महागडा किंवा आपल्या पारंपरिक भारतीय आहारापेक्षा पूर्णपणे वेगळा असण्याची गरज नाही. अनेक वर्षांपासून हृदयाच्या आरोग्यासाठी ''तळलेले पदार्थ टाळा, मीठ कमी करा, साखर टाळा, चरबी कमी करा'' अशा सूचना दिल्या जातात. हे पदार्थ मर्यादित प्रमाणात घेणे महत्त्वाचे आहे. मात्र, त्यासोबत ''माझा आहार अधिक आरोग्यदायी करण्यासाठी मी त्यात काय वाढवू शकतो?'' असा विचार करणे अधिक उपयुक्त ठरू शकते. आहारात अधिक भाज्या आणि हंगामी फळे, डाळी, कडधान्ये, मोड आलेली कडधान्ये आणि प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करा. ओट्स, दलिया, गव्हाचे पीठ आणि मिलेट्स यांसारखी अख्ख्या धान्यांपासून तयार केलेली पदार्थ अधिक वेळा खा. थोड्या प्रमाणात कडधान्ये, नट्स आणि बिया आहारात घ्या. तसेच, जास्त प्रक्रिया केलेल्या पदार्थांऐवजी घरचे ताजे पदार्थ खाण्याला प्राधान्य द्या. या सोप्या बदलांमुळे आहारात मीठ, अतिरिक्त साखर आणि आरोग्यासाठी हानिकारक चरबी असलेल्या पदार्थांसाठी ताटात आपोआप कमी जागा उरेल. हृदयाची काळजी घेण्यासाठी आपल्याला आहाराचे कोणतेही कठीण किंवा परदेशातील ट्रेंड फॉलो करण्याची गरज नाही. आपल्या भारतीय स्वयंपाकघरातच अनेक पौष्टिक पदार्थ उपलब्ध आहेत. डाळी, राजमा, हरभरा, मोड आलेली कडधान्ये, भाज्या, फळे, संपूर्ण धान्य, कडधान्ये, बिया आणि आंबवलेले



पदार्थ संतुलित आहाराचा भाग असू शकतात. महत्त्वाचे म्हणजे हे पदार्थ किती वेळा, किती प्रमाणात आणि कशा पद्धतीने तयार केले जातात. भाज्यांसोबत डाळ आणि पोळी असा आहार पौष्टिक आणि संतुलित जेवण ठरू शकतो. पॅकेटमधील नमकीनऐवजी भाजलेले चणे खाता येतील. तसेच, बहुतेक दिवस गोड पदार्थ खाण्याऐवजी ताजी हंगामी फळे खाता येतात. गोड पेयांऐवजी ताक हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. पारंपरिक पदार्थ बनवण्याच्या पद्धतीत आणि खाण्याच्या प्रमाणात छोटे बदल करून त्यांना अधिक आरोग्यदायी बनवता येते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आहारातील लपलेले मीठ. आहारातील मीठ म्हणजे फक्त आपण जेवणात चमच्याने वरून घातलेले मीठ नाही. नमकीन, चिप्स, इन्स्टंट पदार्थ, सॉस, लोणची, पापड आणि रेडी-टू-ईट पदार्थ यांसारख्या पॅकेज्ड आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांमधूनही मोठ्या प्रमाणात मीठ शरीरात जाते.अशा पदार्थांचे सेवन कमी करणे आणि जेवणात आपोआप जास्त मीठ घालण्याआधी त्याची चव घेणे, हे रक्तदाब नियंत्रणासाठी छोटे पण महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. हृदयासाठी योग्य आहार म्हणजे पूर्णपणे चरबीमुक्त आहार नव्हे. त्याऐवजी आरोग्यासाठी चांगल्या चरबीचे स्रोत निवडणे आणि त्यांचा योग्य प्रमाणात वापर करणे महत्त्वाचे आहे. कडधान्ये, बिया आणि वनस्पतीजन्य तेलांचा संतुलित आहारात समावेश करता येतो. मात्र, सॅच्युरेटेड आणि ट्रान्स फॅट जास्त असलेल्या पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवावे. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की ''आरोग्यदायी चरबी'' म्हणजे ती अमर्याद प्रमाणात खावी असे नाही. पदार्थांचे प्रमाण आणि ते किती वेळा खाल्ले जातात, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. आपले आवडते पदार्थ पूर्णपणे बंद करण्याऐवजी रोजच्या आहारात काही छोटे बदल करून तो अधिक आरोग्यदायी बनवता येतो. गोड पेयांऐवजी पाणी, लिंबूपाणी किंवा साखर न घातलेले ताक घेता येते. पॅकेटमधील नमकीनऐवजी भाजलेले चणे किंवा थोड्या प्रमाणात नट्स खाता येतात. तेलात तळलेल्या पदार्थांऐवजी वाफवलेले किंवा भाजलेले पदार्थ निवडता येतात. रिफाइंड धान्यांऐवजी ओट्स, दलिया किंवा पारंपरिक अख्ख्या धान्यांपासून बनवलेले पदार्थ अधिक वेळा खा. वारंवार मिठाई खाण्याऐवजी ताजी हंगामी फळे खाता येतात. तसेच, जास्त प्रक्रिया केलेल्या पदार्थांऐवजी साधे घरगुती जेवण घेता येते. हे बदल अगदी सोपे वाटू शकतात. मात्र, ते नियमितपणे पाळल्यास दीर्घकालीन आरोग्यदायी सवयींचा भाग बनू शकतात. हृदयासाठी योग्य आहारात अनेक पदार्थ सहजपणे समाविष्ट करता येतात. ओट्स आणि संपूर्ण धान्यांमध्ये आहारातील तंतू (फायबर) असतात. त्यामुळे पोट अधिक वेळ भरलेले राहण्यास मदत होते. डाळी, कडधान्ये आणि चणे हे कमी खर्चात मिळणारे वनस्पतीजन्य प्रथिने आणि फायबरचे चांगले स्रोत आहेत. बदाम, अक्रोड, जवस, चिया आणि इतर बियांमध्ये आरोग्यासाठी उपयुक्त चरबी असते. त्यांचा योग्य प्रमाणात आहारात समावेश करता येतो. विविध रंगांच्या भाज्या आणि फळांमधून वेगवेगळी जीवनसत्त्वे, खनिजे आणि इतर पोषक घटक मिळतात. घरचे दही यांसारखे पारंपरिक आंबवलेले पदार्थही आहारात विविधता आणतात आणि शरीराला उपयुक्त पोषक घटक मिळवून देतात. मात्र, हृदयाचे आरोग्य केवळ एका पदार्थावर किंवा एका वेळच्या आरोग्यदायी जेवणावर अवलंबून नसते. नियमित व्यायाम किंवा शारीरिक हालचाल, योग्य वजन राखणे, तंबाखूचे सेवन टाळणे, पुरेशी झोप घेणे तसेच रक्तदाब, रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवणेही महत्त्वाचे आहे. आरोग्यदायी आहाराचा सर्वाधिक फायदा तेव्हाच होतो, जेव्हा तो संपूर्ण निरोगी जीवनशैलीचा एक भाग बनतो. म्हणूनच, या जागतिक हृदय दिनानिमित्त हृदयाच्या आरोग्याकडे काही काळासाठी पाळायचा ''डाएट'' म्हणून न पाहता, तो जीवनशैलीचा एक भाग बनवूया. प्रत्येक जेवणात सर्व काही परिपूर्ण असण्याची गरज नाही. मात्र, आयुष्यभर आरोग्यदायी सवयी सातत्याने पाळणे महत्त्वाचे आहे. या जागतिक हृदय दिनानिमित्त लक्षात ठेवा : आहारात अधिक रंगीबेरंगी फळे-भाज्या घ्या. अधिक हालचाल करा. योग्य पदार्थांची निवड करा. प्रक्रिया केलेले पदार्थ कमी खा आणि तुम्ही खाल्लेल्या प्रत्येक घासाला महत्त्व द्या.

# परंपरेचा वारसा जपत तांबे कुटुंबीयांची आकर्षक गणेश आरस

### श्रद्धा, कलाकुसर आणि कल्पकतेचा अनोखा संगम; परिसरातील भाविकांची मोठी गर्दी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**गोरेगाव–** पुरातन काळापासून चालत आलेल्या परंपरेचा वारसा जपत गीता भाऊसाहेब तांबे, भाऊसाहेब गोधाजी तांबे, नर्मदा भाऊसाहेब तांबे आणि गणेश भाऊसाहेब तांबे या तांबे कुटुंबीयांनी यंदा अप्रतिम अशी गणेश आरस साकारली आहे. आकर्षक सजावट, कलात्मक मांडणी आणि पारंपरिकतेचा सुंदर मिलाफ असलेली ही गणेश आरस परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

ही देखणी गणेश आरस पाहण्यासाठी गोरेगाव, हिवरे कोरडा, पाडळी, डिस्कळ यासह आजूबाजूच्या परिसरातून भाविक व नागरिक मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याची तांबे कुटुंबीयांची ही कल्पना विशेष कौतुकास्पद ठरत आहे.

श्रद्धा, परंपरा आणि कलेचा सुंदर संगम असलेल्या या गणेश आरसमध्ये तांबे कुटुंबीयांची मेहनत, कल्पकता आणि गणरायाप्रती असलेली भक्ती प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या या उपक्रमामुळे गणेशोत्सवातील पारंपरिक कलावैभवाला नव्याने उजाळा मिळाला असून, परिसरात या गणेश आरसेची चर्चा रंगली आहे.



उपमहापौर धनंजय जाधव यांनी ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणपतीची आरती केली यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर ,सचिव अशोक कानडे ,पांडुरंग नन्नवरे ,चंद्रकांत फुलारी ,रंगनाथ फुलसौंदर , प्रा माणिकराव विधाते आदी उपस्थित होते.



महापौर जोती गाडे यांनी ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणपतीची आरती केली यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर ,ज्ञानेश्वर रासकर ,प्रा माणिकराव विधाते ,संजय चाफे ,नितीन पुंड आदी उपस्थित होते.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणपतीची आरती केली यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर ,ज्ञानेश्वर रासकर ,प्रा माणिकराव विधाते ,संजय चाफे ,नितीन पुंड आदी उपस्थित होते (सर्व छाया- राजू खरपुडे ,नगर)

# श्री अंबिका विद्यालयात १३९ वा कर्मवीर जयंती सोहळा उत्साहात साजरा

**भव्य कर्मवीर रथ मिरवणुकीने केडगाव परिसर दुमदुमला; पद्मश्री पोपटराव पवार, प्रा. प्रशांत खामकर यांची प्रमुख उपस्थिती**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्थेचे श्री अंबिका विद्यालय, केडगाव देवी, ता. जि. अहिल्यानगर येथे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त भव्य आणि उत्साहपूर्ण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विविध उपक्रम, आकर्षक कर्मवीर रथ मिरवणूक आणि मान्यवरांच्या प्रेरणादायी विचारांनी संपूर्ण विद्यालय परिसर कर्मवीरमय झाला.

सकाळी ठीक ८ वाजता कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांनी सजविलेल्या आकर्षक कर्मवीर रथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत झांज पथक, लेझीम पथक, दांडिया पथक, झेंडा पथक, कलश पथक, वृक्षदिंडी, पुस्तक दिंडी आदी विविध पथकांनी सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थी, विविध सामाजिक व शैक्षणिक संदेश देणारे फलक आणि आकर्षक कर्मवीर रथाने ग्रामस्थांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

''रयत शिक्षण संस्थेचा विजय असो!'', ''कर्मवीर भाऊराव पाटील यांचा विजय असो!'' अशा घोषणांनी केडगाव परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्तबद्ध मिरवणूक आणि कर्मवीरांच्या विचारांचा जागर यामुळे वातावरणात उत्साहाचे चैतन्य निर्माण झाले. यानंतर सकाळी १० वाजता कर्मवीर जयंतीनिमित्त मुख्य सभेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनावर आधारित पोवाडा सादर केला.कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी पद्मश्री पोपटराव पवार होते. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तके आवर्जून वाचावीत, असा प्रेरणादायी संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. प्रशांत खामकर यांनी आपल्या ओजस्वी, प्रभावी आणि प्रेरणादायी वाणीने उपस्थितांची मने जिंकली. त्यांनी कर्मवीरांच्या जीवनकार्याचा केवळ परिचय करून न देता ''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'' या विचारामागील व्यापक शैक्षणिक तत्त्वज्ञान, त्याग, संघर्ष, ध्येयवाद आणि समाजातील तळागाळातील वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याची कर्मवीरांची अखंड तळमळ प्रभावीपणे विद्यार्थ्यांसमोर मांडली. त्यांच्या अभ्यासपूर्ण विवेचनातून कर्मवीरांच्या कार्याची प्रेरणा, शिक्षणाचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांसमोर उभा राहणारा आदर्श प्रकर्षाने जाणवला. त्यांच्या विचारांनी विद्यार्थी, शिक्षक, सेवकवर्ग आणि उपस्थित मान्यवरांच्या मनावर कर्मवीरांच्या विचारांचा ठसा उमटविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य तथा रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी श्री. नवनाथ बोडखे यांनी केले. त्यांनी विद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर करताना स्पर्धा परीक्षांमधील विद्यालयाची उल्लेखनीय प्रगती, विद्यार्थ्यांनी संपादन केलेल्या शिष्यवृत्ती, विद्यालयाची नूतन वास्तू, सेवकवर्गाचे योगदान तसेच विद्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

# मेहेर इंग्लिश स्कूलचा उपक्रम : शाडू मातीच्या गणपतीचे पर्यावरणपूरक विसर्जन

**बाप्पाला निरोप देताना विद्यार्थी झाले भावूक**
**मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये सामाजिक एकतेचा संदेश**





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री गणेशाचे पर्यावरणपूरक व पारंपरिक पद्धतीने विसर्जन करण्यात आले. सालाबादप्रमाणे शाळेत शाडू मातीचा गणपती बसविण्यात येतो. विद्यार्थ्यांना सण-उत्सवाची माहिती व्हावी यासाठी हा अभिनव उपक्रम मेहेर इंग्लिश स्कूलच्या वतीने घेण्यात येतो. यावेळी शाळेचे चेअरमन जगदीश झालानी, प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगदीश झालानी म्हणाले, ''गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकतेचा संदेश देणारा उत्सव आहे. आम्ही मुद्दाम पीओपी ऐवजी शाडू मातीचा गणपती बसवतो, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण व्हावी. आपले सण, आपली परंपरा आणि पर्यावरण यांचा समतोल कसा राखायचा हे यातून मुलांना शिकायला मिळते. सर्व धर्म, सर्व जातीचे विद्यार्थी एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात, हाच खरा सामाजिक एकतेचा संदेश आहे. हेच संस्कार उद्याचे सुजाण नागरिक घडवतील.यावेळी बाप्पाला निरोप देताना शाळेचे विद्यार्थी भावूक झाले होते.

# पारनेरच्या पाणी योजनेसाठी शरद पवारांचा पुढाकार

**मुख्यमंत्र्यांकडून तत्काळ कार्यवाहीचे निर्देश**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर शहराच्या दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने प्रस्तावित असलेल्या ६३ कोटी ४७ लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला अंतिम मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. यासंदर्भात पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना निवेदन व पत्र दिले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी नगरविकास विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.खासदार नीलेश लंके यांच्यासह नगरपंचायतचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

पारनेर शहराचा पाणीप्रश्न अनेक वर्षांपासून कायमस्वरूपी तोडग्याच्या प्रतीक्षेत आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या या योजनेला गती देण्याची मागणी पवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

या पाणीपुरवठा योजनेची अंदाजित किंमत ६३.४७ कोटी रुपये असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडून प्रकल्पाला तांत्रिक मान्यता देण्यात आल्याचे पवार यांनी पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे आता शासनस्तरावर प्रशासकीय मंजुरी आणि निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

योजनेच्या अंदाजित खर्चामध्ये जीएसटी, कामगार विभागाचे शुल्क तसेच महावितरणचे शुल्क यांचा समावेश करण्यात आला आहे. तांत्रिक स्तरावरील प्रक्रिया पूर्ण झाल्या असल्याने प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीसाठी शासनाची अंतिम मंजुरी महत्त्वाची ठरणार आहे. पारनेर शहरासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची असून, तिची अंमलबजावणी झाल्यास नागरिकांना दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रकल्पास अंतिम मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत, अशी मागणी पवार यांनी केली.

पवार यांच्या पत्राची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीच्या सूचना दिल्याने पारनेरच्या पाणी योजनेच्या मंजुरीच्या प्रक्रियेला आता शासनस्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी बाळासाहेब कावरे, नितीन अडसूळ, सुभाष शिंदे, बाळासाहेब नगरे, भूषण शेलार, अमित जाधव, अर्जुन भालेकर, दादा औटी, सचिन औटी, शुभम देशमुख आणि योगेश मते उपस्थित होते. पारनेर शहराच्या पाणीप्रश्नावर सातत्याने होत असलेल्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर आता ६३.४७ कोटी रुपयांच्या प्रस्तावित योजनेला प्रशासकीय मंजुरी आणि निधी कधी उपलब्ध होतो, याकडे पारनेरकरांचे लक्ष लागले आहे.

(पान १ वरून)

## भिंगारमध्ये विसर्जनावरून रणकंदन!

आमदार संग्राम जगताप घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नागरिक व कार्यकर्त्यांकडून संपूर्ण घटनेची माहिती घेतली. पोलिसांच्या लाठीमारामुळेच युवकाचा मृत्यू झाल्याचा आरोप करत त्यांनी या प्रकरणाची तातडीने आणि सखोल चौकशी करण्याची मागणी केली. घटनेनंतर गणेश विसर्जनाची मिरवणूकही थांबवण्यात आली. एक गणपती रस्त्यावरच थांबून राहिल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली. दरम्यान, परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. मात्र पोलिस अधीक्षकांच्या या स्पष्टीकरणानंतरही भिंगारवासीयांचा संताप कमी झालेला नाही. गुरुवारी सकाळी ११ वाजता संतप्त नागरिकांनी नगर-पाथर्डी मार्गावर रास्तारोको सुरू केला. आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली. भिंगार शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले असून, पोलिस प्रशासनाच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर भिंगारमध्ये मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**'इतका मोठा जमाव खोटे बोलेल का?'**

आमदार संग्राम जगताप यांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते जाहीरपणे पोलिसांनी भगवे ध्वज व गुलालाच्या गोण्या हिसकावून घेतल्याचे सांगत आहेत. एवढा मोठा जमाव पोलिस प्रशासनाविरोधात खोटे बोलेल का, असा सवाल जगताप यांनी उपस्थित केला. घटना घडल्यानंतर पोलिस प्रशासनातील काही व्यक्ती संबंधितांच्या घरात जाऊन फुटेज डिलीट करण्यास सांगत असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे. या आरोपांचीही सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, अहिल्यानगर शहरातील प्रमुख गणेश मंडळांनीही या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. योग्य तो गुन्हा दाखल करून दोषींवर कारवाई झाली नाही, तर शहरातील गणेश मंडळांकडून विसर्जन न करण्याची भूमिका घेतली जाऊ शकते, असा इशाराही देण्यात आल्याचे आमदार जगताप यांनी सांगितले. त्यामुळे भिंगारमधील एका युवकाच्या मृत्यूने सुरू झालेला वाद आता शहरातील गणेश विसर्जनाच्या प्रश्नापर्यंत पोहोचला आहे.

एकीकडे पोलिस प्रशासनाकडून 'लाठीमारामुळे मृत्यू झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट नाही; शवविच्छेदनानंतर सत्य समोर येईल' अशी भूमिका मांडली जात आहे, तर दुसरीकडे नागरिक आणि कार्यकर्ते 'मृत्यूला नेमके कारण काय?' याचा जाब मागत रस्त्यावर उतरले आहेत. त्यामुळे दीपक वाघस्कर यांच्या मृत्यूचे नेमके कारण, मिरवणुकीदरम्यान नेमके काय घडले आणि पोलिसांकडून बळाचा वापर कितपत झाला, या तीन प्रश्नांवर आता संपूर्ण भिंगारचे लक्ष लागले आहे. चौकशी आणि शवविच्छेदन अहवालातून सत्य बाहेर येणे अपेक्षित असून, तोपर्यंत या प्रकरणावरून भिंगारमधील तणाव कायम असल्याचे चित्र आहे.

## प्रोफेसर कॉलनी चौकातील खाद्यपदार्थ स्टॉलवर अन्न व औषध प्रशासनाची धाड

यावेळी संस्थेच्या संस्थापिका वैशाली गांधी, रूपाली बिहानी, अनुराधा रेखी, विकास जाधव, तुषार भंडारी आदी उपस्थित होते. हायजिन फर्स्ट संस्थेच्या संस्थापिका वैशाली गांधी म्हणाल्या की, प्रोफेसर कॉलनी चौक हा 'हायजिन चौक' करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खाद्यपदार्थांच्या स्टॉलची तपासणी करून संबंधित व्यवसायिकांना स्वच्छतेबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

नगरकरांना स्वच्छ, सुरक्षित आणि हायजिनिक खाद्यपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी हायजिन फर्स्ट संस्था शहरात सातत्याने काम करत आहे. खाद्यपदार्थ व्यवसायिकांमध्ये स्वच्छता आणि आरोग्यविषयक जनजागृती करण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे वैशाली गांधी यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी खाद्यपदार्थांमध्ये होणाऱ्या भेसळीविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची असून त्याचे कौतुक केले पाहिजे. हायजिन फर्स्ट संस्था गेल्या अकरा वर्षांपासून शहरातील नागरिकांना चांगले आरोग्य मिळावे, यासाठी समाजामध्ये तसेच खाद्यपदार्थ व हॉटेल व्यावसायिकांमध्ये स्वच्छता आणि आरोग्याबाबत जनजागृती करण्याचे काम करत आहे. नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी संस्थेकडून करण्यात येणारे प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे बारस्कर यांनी सांगितले. रूपाली बिहानी म्हणाल्या की, प्रोफेसर कॉलनी चौक परिसरात मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांचे स्टॉल आहेत. या स्टॉलची स्वच्छता राखणे तसेच नागरिकांना चांगल्या दर्जाचे खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणे ही खाद्यपदार्थ व्यावसायिकांची जबाबदारी आहे. नागरिकांना चांगले आणि स्वच्छ खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी हायजिन फर्स्ट संस्था सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

## वीस मिनिटांचा पाऊस; दुकानदारांच्या डोळ्यात पाणी!

महानगरपालिका प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले. अवघ्या २० मिनिटांच्या पावसात दुकानांमध्ये पाणी शिरणे ही सामान्य बाब नसून तुंबलेले चेंबर्स, अपुरा पाण्याचा निचरा आणि या भागातील काँक्रिट रस्त्याच्या कामाची गुणवत्ता याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे संबंधित कामांची तातडीने तांत्रिक तपासणी करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. महानगरपालिकेच्या कामांबाबत नागरिकांकडून सातत्याने प्रश्न उपस्थित होत असताना या घटनेमुळे पुन्हा एकदा कामांची गुणवत्ता आणि नियोजनाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. चुकीचे नियोजन, निकृष्ट काम किंवा देखभालीतील निष्काळजीपणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी गाडे यांनी केली.

नुकसानग्रस्त दुकानदारांचा तातडीने पंचनामा करून झालेल्या नुकसानीचा वस्तुनिष्ठ आढावा घ्यावा आणि त्यांना योग्य ती नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. घटना घडूनही पंचनामा न झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. कंत्राटदार अथवा संबंधित अधिकाऱ्यांची चूक आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करून नुकसानभरपाईची जबाबदारी निश्चित करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या घटनेमुळे आर्थिक नुकसान झालेल्या एका दुकानदाराने नैराश्यातून आत्महत्येचा विचार व्यक्त केल्याने उपस्थितांमध्ये चिंता निर्माण झाली. यावेळी गाडे यांनी संबंधित दुकानदाराचे सांत्वन करून, ''तुमची कोणतीही चूक नाही. कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नका; तुमच्या पाठीशी आम्ही आहोत,'' असा धीर दिला.

नागरिकांकडून कर वसूल करूनही मूलभूत सुविधांची अशी अवस्था होत असेल, तर प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. नागरिकांच्या जीवितासह त्यांच्या कष्टाच्या पैशाची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची आहे. नुकसानग्रस्त दुकानदारांना न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे गाडे यांनी सांगितले.

यावेळी जयंत विठ्ठलराव देशमुख, विवेक जाधव, सुयोग देशमुख, प्रथमेश महेंद्रकर, अक्षय भालेराव, रावसाहेब कवणे यांच्यासह परिसरातील नागरिक व व्यावसायिक उपस्थित होते.

## नेवासा पोलिसांच्या पाठीशी वरिष्ठ खंबीर; राजकीय दबावाला बळी न पडता काम करण्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांचे निर्देश

पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक राजकीय व सामाजिक तणावाचे प्रसंग निर्माण झाले होते. या संवेदनशील परिस्थितीत जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घेतलेली कणखर भूमिका आणि परिस्थिती संयमाने हाताळण्यासाठी केलेले प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद असल्याचे येनपुरे यांनी नमूद केले. या पाहणीदरम्यान त्यांनी पोलीस ठाण्यातील विविध विभागांच्या कामकाजाची माहिती घेतली. प्रलंबित गुन्हे, गुन्हे तपासाची गती आणि संवेदनशील घटनांमध्ये पोलिसांनी केलेल्या कारवाईचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करताना अनेकदा आव्हानात्मक प्रसंगांना सामोरे जावे लागते; अशा वेळी प्रामाणिकपणे आणि निडरपणे कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांच्या पाठीशी पोलीस प्रशासन पूर्ण ताकदीने उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या नेतृत्वाखालील नेवासा पोलिसांच्या कामगिरीचे विशेष कौतुक करत त्यांनी तणावपूर्ण परिस्थिती हाताळण्यासाठी त्यांना पूर्ण पाठबळ दिले. या प्रसंगी पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनीही नेवासा पोलीस ठाण्याच्या कामाचे कौतुक केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः प्रत्यक्ष भेट देऊन कर्मचाऱ्यांशी संवाद साधल्याने आणि दिलेल्या भक्कम पाठबळामुळे नेवासा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.